

# शाळेतल्या आंबट-गोड आठवणी

## जयंत नारळीकर

माझे बालपण बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या रम्य आवारात खेळण्यात-वाचण्यात-अभ्यासात कसे गेले ते कळलेच नाही. मी व माझा भाऊ (दोन वर्षांनी लहान) ज्या शाळेत जात होतो तिचे नाव युनिव्हर्सिटी चिल्ड्रेन्स स्कूल... आज तिचे केंद्रीय विद्यालय झाले असून त्याचा व्यापही पूर्वीपेक्षा तिप्पट-चौपट झाला असेल. तिथल्या १९४३-५३ कालखंडातल्या या काही निवडक आठवणी.

★

१९४३ च्या जुलै महिन्यात शाळा उघडताच मला तिथल्या 'इन्फंट्स' (बच्चे लोकांच्या) क्लासमध्ये दाखल करण्यात आले... तो दिवस अंधुकसा आठवतोय. माझ्याबरोबर आईवडील व धाकटा भाऊ आले होते. वर्गशिक्षिका 'बहिनजी' यांनी प्रेमाने मला वर्गात घेतले. ते त्यांचे वात्सल्य मी शाळा सोडून अनेक वर्षे झाली तरी अनुभवायास मिळे. त्या दिवशी मला पोहोचवून बाकीचे घरी परत गेले तेव्हा मला वाटते माझ्या शाळेत जाण्याच्या उत्साहावर पाणी पडले पण डोळ्यातून मात्र नाही.

अर्थात काही कालखंड असा गेला जेव्हा मी शाळेत जात होतो व माझा भाऊ घरी मजा करीत होता. मला राहवले नाही... मी पोट दुखण्याचे सोंग केले. मास्तरांनी मला घरी पाठवले. आईला मात्र दुखण्याच्या खरेपणाबद्दल शंका आली. त्या शंकेला मी यथाशक्ती तोंड दिले पण वडिलांपुढे टिकाव लागला नाही. परत झाली शाळेकडे रवानगी!

★

श्री. ब्रिजबिहारीलाल वर्मा आमच्या शाळेचे हेडमास्तर होते. हेडमास्तरने असावे तसे कडक होते पण तरी विद्यार्थ्यांबद्दल आस्थाही पुष्कळ दाखवत. एकदा 'खाली पीरियड'मध्ये ते आमच्या वर्गात आले आणि वर्गाचे दोन गट पाडून त्यांच्यात हिंदी कवितांच्या भेंड्या लावल्या. कुठलाच गट फार वेळ टिकला नाही. तेव्हा त्यांनी सर्व अक्षरे विद्यार्थ्यांत वाटून दिली आणि सांगितले की प्रत्येकाने आपापल्या अक्षरांच्या कविता पाठ करायच्या. पुढे आमच्या वर्गाची वरच्या वर्गाशी भेंड्यांची लढत झाली तेव्हा प्रत्येक अक्षराला विद्यार्थी तयार असल्याने आम्ही सहज विजय मिळविला.

भेंड्यांच्या बाबतीत आणखी एक आठवण! एकदा एका लहानशा समारंभ प्रसंगी संस्कृतचे एक अभ्यासक प्रमुख पाहुणे म्हणून शाळेत आले. त्यांनी गंमत म्हणून नववी व दहावीत संस्कृत भेंड्या लावल्या. मी नववीत होतो व घरी आईने पुष्कळ स्तोत्रे, श्लोक आदींचे पाठांतर करवून घेतले असल्याने मी माझ्या वर्गाच्या नववीतर्फे एकटाच जवळजवळ सर्व भेंड्या खेळून दहावीवर मात करू शकलो तेव्हा प्रमुख पाहुण्यांनी माझे कौतुक केल्याचे स्मरते.

★

मी दहावीत असताना आमचे हेडमास्तर हिंदीचे तास घेत असत. मॅट्रिकमध्ये हिंदी भाषेत 'डिस्टिंक्शन' (कमीत कमी ७५ टक्के मार्क) मिळणे कठीण समजले जाई. मलाही ते मिळेल असे वाटले नव्हते व त्या दृष्टीने मी त्या विषयावर फारशी मेहनतही घेत नव्हतो. पण सहामाहीचा माझा हिंदीचा पेपर तपासून ६५ टक्के मार्क देऊन हेडमास्तरांनी शेरा मारला, ''तुला काही मॅट्रिकमध्ये ७५ टक्के मिळणार नाहीत.''

मला आश्चर्य वाटले, कारण मी ७५ टक्के मिळतील अशी अपेक्षाच ठेवली नव्हती. मी वर्माजींना त्यांच्या शेऱ्याबद्दल विचारले तेव्हा ते म्हणाले, ''ते एक आव्हान समज! डिस्टिंक्शनसाठी प्रयत्न केलास तर मिळेल,'' त्यांनी तयारी करायला विशेष सूचना दिल्या आणि मी माझे प्रयत्नही वाढवले. अखेर मला मॅट्रिकमध्ये हिंदीत डिस्टिंक्शन मिळाले तेव्हा त्यांच्याकडे गेलो. ते आनंदाने म्हणाले, ''माझी भविष्यवाणी खोटी झाली याचे मला समाधान वाटते.''

★

आमच्या घरी बॅडमिंटन कोर्ट होते त्यावर सराव करून आम्ही दोघे भाऊ त्या खेळात बरेच तरबेज झालो होतो पण शाळेत त्याला वाव नव्हता. क्रिकेट-हॉकी-

फुटबॉलसारख्या मैदानी खेळात मी शाळेच्या संघामध्ये प्रवेश मिळवण्याइतका भाग घेतला नव्हता. इतर ॲथलेटिक स्पोर्टस्‌मध्ये सुद्धा मी मागे पडत असे. पण अखेर वार्षिक स्पर्धांमध्ये शाळेत आणखी एका रेसचा प्रकार आणला ज्यांत मला भरपूर वाव होता. ती म्हणजे 'अंकगणिताची रेस.'

या रेसमध्ये अंकगणितातले तीन कूटप्रश्न दिले जायचे. पळून पहिल्या थांब्यावर ते प्रश्न मिळत; ते सोडवून उत्तरे घेऊन पुन्हा पळत दुसऱ्या थांब्यावर पोचायचे. जो सर्व प्रश्न बरोबर सोडवून सर्वात आधी तेथे पोहोचेल तो जिंकला. त्या शर्यतीत मी तीन वर्षे भाग घेऊन प्रत्येक वेळी पहिले बक्षीस मिळवले.

★

मला वाटते हा प्रसंग आठवीतला असावा. मी वर्गाचा 'प्रीफेक्ट' होतो. त्या दिवशी शेवटचा तास 'ड्रिल'चा होता. पण ड्रिलमास्तर गैरहजर होते. जर तास होणारच नसेल तर थांबायचे कशाला असे प्रत्येकाला वाटत होते. मी पण अपवाद नव्हतो. शेवटी एक मुलगा चौकशी करायला वर्गाबाहेर पडला व लवकरच परत आला, सांगत की, प्रत्येक मास्तर वर्ग घेत आहेत तेव्हा ड्रिल घ्यायला कोणी नाही. प्रत्येकाने ड्रिल होणार नाही असे गृहीत धरून घरची वाट धरली.

दुसऱ्या दिवशी हेडमास्तरांचे मला बोलावणे आले. कोणी मास्तर मोकळे नाहीत म्हणून ते स्वतः ड्रिल घेण्यासाठी वर्गाकडे आले तर वर्ग मोकळा! त्यांनी मला जबाबदार धरले. प्रीफेक्ट म्हणून मी योग्य माहिती अन्‌ परवानगीशिवाय वर्गाला घरी जाऊ दिले हे चूक होते. ''पण सर! माझे कोणी ऐकणारे नव्हते. सगळे घरी पळाले.'' मी बचावाचा प्रयत्न केला. ''मान्य आहे. पण तुला एकट्याला तरी थांबता आले असते! प्रीफेक्टने स्वतःच्या उदाहरणाने इतरांना मार्गदर्शन करायचे नाही का?'' त्यांनी सौम्य शब्दात मला समजावले.

मोठ्या पदापाठोपाठ आपल्यावर मोठी जबाबदारीही येते याची मला त्या दिवशी जाणीव झाली.

★